# कार्यालय नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभाग)

मा. प्रशासक तथा अध्यक्ष वृक्ष प्राधिकरण समिती, मनपा नागपूर यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवार दिनांक 17.07.2025 रोजी वेळ दुपारी 12.30 वाजता नविन प्रशासकीय इमारतीच्या सभागृहात संपन्न झालेल्या वृक्ष प्राधिकरण सभेचे इतिवृत्त.

या सभेस खालीलप्रमाणे अधिकारी उपस्थित आहेत.

1) श्रीमती. वैष्णवी बी. अति. आयुक्त (सेवा)

2) श्री. गणेश राठोड, उपायुक्त (उद्यान) तथा वृक्ष अधिकारी

3) श्री. अमोल चौरपगार, वृक्ष संवर्धक

4) श्री. कौस्तव चटर्जी, सदस्य

या सभेत खालील प्रमाणे नमूद विषयावर चर्चा होऊन निर्णय घेण्यात आले.

### विषय क्र. 1

कार्यालयास दिनांक 18.11.2024 ला प्राप्त २४ MIG होल्डर्स गृह निर्माण सोसायटी, काचीपुरा नागपूर यांनी प्लॉट नं. 119, 120, 127 & 128 सीटीएस नं. 592, शिट नं. 37, मौजा-लेन्ड्रा, इस्ट हायकोर्ट रोड, रामदासपेठ, नागपूर येथील जागेवरील प्रस्तावित नविन इमारतीच्या बांधकामात अडथळा निर्माण करणारी झाडे तोडण्याबाबत परवानगी मागितलेली आहे.

या प्रकरणी पाहणी करण्यात आली असता, प्लॉट नं. 119, 120, 127 & 128 सीटीएस नं. 592, शिट नं. 37, मौजा-लेन्ड्रा, इस्ट हायकोर्ट रोड, रामदासपेठ, नागपूर येथील जागेवर असलेली पुरातन **(हेरीटेज)** एक आंबा, एक उंबर व एक आडजात अशी एकूण 3 नग झाडे प्रस्तावित नविन इमारतीच्या बांधकामात व खोदकामात अडथळा निर्माण करीत आहेत.

**या प्रकरणी वर्तमान पत्रात जाहिरात क्र. PR/ 127 अन्वये दिनांक 23.05.2025 ला जाहिरात प्रसिद्ध करून नागरिकांचे आक्षेप मागविण्यात आले असता प्रसिद्ध करण्यात आलेल्या जाहिरातीवर नागरिकांचे आक्षेप प्राप्त झाले. त्यानुषंगाने दिनांक 06.06.2025 रोजी आक्षेपकर्त्यांची सुनावणी घेण्यात आली असून आक्षेपकर्त्यांनी पर्यायी वृक्ष लागवड व प्रतिज्ञापत्र**

A

**सादर केल्याशिवाय वृक्ष तोडीची परवानगी देण्यात येऊ नये, या स्वरूपाच्या आक्षेपाची नोंद केली आहे. सभेचे इतिवृत्त नस्तीस सलग्न आहे.**

या प्रकरणी अर्जदारास सदर ठिकाणच्या नविन प्रस्तावित इमारतीच्या बांधकामात अडथळा निर्माण करणाऱ्या पुरातन एक आंबा, एक उंबर व एक आडजात अश्या एकूण 3 नग झाडाच्या मोबदल्यात नविन सावलीची 164 नग झाडांची लागवड करण्याबाबत पत्र देण्यात आले आहे. अर्जदाराने तोडण्यात येणाऱ्या झाडाच्या मोबदल्यात पर्यायी वृक्ष लागवड मौजा-दाभा, खसरा क्र. 169/2, हर्षा को-ऑपरेटीव्ह हाऊसिंग सोसायटी या अभिन्यासातील मोकळ्या जागेत 164 नग झाडांची लागवड केली आहे.

करीता प्लॉट नं. 119, 120, 127 & 128 सीटीएस नं. 592, शिट नं. 37, मौजा-लेन्ड्रा, इस्ट हायकोर्ट रोड, रामदासपेठ, नागपूर येथील नविन इमारतीच्या प्रस्तावित बांधकामात अडथळा निर्माण करणाऱ्या **पुरातन (हेरिटेज)** एक आंबा, एक उंबर व एक आडजात अशी एकूण 3 नग झाडाच्या मोबदल्यात **महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग पाच, जुलै 5, 2021/आषाढ 14, शके 1943 अन्वये प्रकरण 6 मुख्य अधिनियमाच्या कलम 8 मधील पोट कलम (4) (ब) अन्वये कापणी करण्यात येणाऱ्या त्याच जातीचे किंवा इतर कोणत्याही मूळ जातीचे कापणी करण्यात येणाऱ्या झाडाच्या अंदाजीत वयाइतक्या झाडाच्या संख्येइतकी किमान 6 फुट इतक्या उंचीची 164 नग नविन झाडांची लागवड करून सात वर्षे देखभाल करणे** या अटीचे पालन होण्यास्तव अर्जदाराकडून डिपॉझिट रु. 1,64,000/- व प्रशासकीय शुल्क रु. 16,400/- असे एकूण रु. 1,80,400/- रक्कम स्विकारण्याच्या अटीवर सदर ठिकाणी असलेली **पुरातन (हेरीटेज)** एक आंबा, एक उंबर व एक आडजात अशी एकूण 3 नग झाडास जमिनिपासून कापणी करण्याची मंजुरी प्रदान करण्याच्या विषयावर सभेत सविस्तर चर्चा करण्यात आली.

तोडण्यात येणाऱ्या झाडाच्या मोबदल्यात पर्यायी नविन सावलीची 6 फुट उंचीची लावण्यात आलेल्या 164 नग झाडांची मौका पाहणी अहवाल नस्तीस सलग्न आहे. तसेच लावण्यात आलेल्या 164 नग झाडांची 7 वर्ष जोपासन देखभाल करण्याबाबतचे प्रतिज्ञापत्र अर्जदाराने कार्यालय दिले आहे. बांधकाम करण्यात येणाऱ्या जागेवर हि झाडे मध्ये भागी असल्याने नविन इमारतीचे बांधकाम व खोदकाम करणे शक्य नाही. करीता उक्त ठिकाणच्या प्रस्तावित नविन इमारतीच्या बांधकामात अडथळा निर्माण करणाऱ्या पुरातन (हेरीटेज) एक आंबा, एक उंबर व एक आडजात अशी एकूण 3 नग झाडास वरील अटी शर्तींच्या अधीन राहून या झाडास जमिनीपासून कापणी करण्याची समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

येणाऱ्या झाडाच्या मोबदल्यात पर्यायी वृक्ष लागवड नॉर्मल स्कूल वसाहत सिताबर्डी, पोलीस लाईन टाकळी व दाभा पोलीस स्टेशन परिसरात जागेत 570 नग झाडांची लागवड केली आहे.

करीता नागपूर जिल्हा विभागीय कार्यालय सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. 1 नागपूर परिसरातील जागेवर कार्यालयीन वरिष्ठ/कनिष्ठ लिपिकांच्या प्रशिक्षणाकरीता नविन इमारतीच्या प्रस्तावित बांधकामात व खोदकामात अडथळा निर्माण करणाऱ्या विविध प्रजातीच्या **पुरातन (हेरीटेज)** 2 व **नॉन हेरीटेज** 21 अश्या एकूण 23 नग झाडाच्या मोबदल्यात **महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग पाच, जुलै 5, 2021/आषाढ 14, शके 1943 अन्वये प्रकरण 6 मुख्य अधिनियमाच्या कलम 8 मधील पोट कलम (4) (ब) अन्वये कापणी करण्यात येणाऱ्या त्याच जातीचे किंवा इतर कोणत्याही मूळ जातीचे कापणी करण्यात येणाऱ्या झाडाच्या अंदाजीत वयाइतक्या झाडाच्या संख्येइतकी किमान 6 फुट इतक्या उंचीची 570 नग नविन झाडांची लागवड करून सात वर्षे देखभाल करणे** या अटीचे पालनहोण्यास्तव अर्जदाराकडून डिपॉझिट रु. 5,70,000/- व प्रशासकीय शुल्क रु. 57,000/- असे एकूण रु. 6,27,000/- रक्कम स्विकारण्याच्या अटीवर सदर ठिकाणी असलेली **पुरातन (हेरीटेज)** एक वड व **नॉन हेरीटेज** एक पिंपळ दोन नग झाडास प्रत्यारोपण करण्याची तसेच विविध प्रजातीची पुरातन एक व **नॉन हेरीटेज** 20 अशी एकूण 21 नग झाडास जमिनिपासून कापणी करण्याची मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्नावर सभेत सविस्तर चर्चा करण्यात आली.

अर्जदाराकडून तोडण्यात येणाऱ्या झाडाच्या मोबदल्यात नविन पर्यायी 570 नग वृक्ष पोलीस स्टेशन दाभा, पोलीस लाईन टाकळी. नॉर्मल स्कूल व शासकीय तंत्र निकेतन, सिताबर्डी येथील परिसरात लावण्यात आली असून त्याबाबतचे पाहणी अहवाल नस्तीस जोडलेले आहे. लावण्यात आलेल्या 570 नग झाडांची 7 वर्ष जोपासना करण्याबाबत अर्जदाराने प्रतिज्ञापत्र कार्यालयास सादर केला आहे. तसेच या प्रकरणी आक्षेप सुनावणी सभेच्या दरम्यान उपअभियंता सा. बां. यांनी कथन केलेले नुसार सदर परिसरामध्ये सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये जुन्या इमारती अस्तित्वात असून सद्या वरिष्ठ व कनिष्ठ लिपिक यांच्या करीता प्रशिक्षण करीता इमारतीचे बांधकाम प्रस्तावित आहे. सद्या स्थितीत उक्त इमारतींची प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली व शासन कडून निधी प्राप्त झाले आहे. परिसरातील इतर इमारतीकरीता निधी उपलब्ध नसल्यामुळे सदर बाबतचा प्रस्ताव सादर करण्यात येऊ शकत नाही. या इमारतीकरीता Environment Clearance लागू नाही. ह्या इमारतीच्या बांधकामामुळे कनिष्ठ व वरिष्ठ लिपिक यांना प्रशिक्षणा करीता अद्यावत सोयी सुविधा उपलब्ध होणार या हेतूने महाराष्ट्र शासनाने निधी मंजूर केलेला असल्याने आक्षेप कर्त्यांनी वरील उपस्थित केलेले आक्षेप अस्वीकार करून सदर ठिकाणच्या कार्यालयीन वरिष्ठ/कनिष्ठ

विषय क्र. 2

कार्यालयास दिनांक 18.11.2024 व 29.11.2025 ला प्राप्त कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. 1 नागपूर यांनी नागपूर जिल्हा विभागीय कार्यालय सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. 1 नागपूर परिसरातील जागेवर कार्यालयीन वरिष्ठ/कनिष्ठ लिपिकांच्या प्रशिक्षणा करीता नविन इमारतीच्या प्रस्तावित बांधकामात अडथळा निर्माण करणाऱ्या विविध प्रजातीच्या झाडास कापणी करण्याची परवानगी मिळण्याकरीता विनंती केली आहे.

या प्रकरणी पाहणी करण्यात आली असता, नागपूर जिल्हा विभागीय कार्यालय सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. 1 नागपूर परिसरातील जागेवर कार्यालयीन वरिष्ठ/कनिष्ठ लिपिकांच्या प्रशिक्षणा करीता नविन इमारतीचे बांधकाम प्रस्तावित असून या जागेवर असलेली **पुरातन (हेरिटेज)** बकुळ-1 व वड-1 तसेच **नॉन हेरीटेज** अमलतास-1, अशोका-7, आंबा-2, उंबर-6, चाफा-1, चिचवा-1, जांभूळ-1, पिंपळ-1 पेरू-1 अशी एकूण (2+21=23) 23 नग झाडे या प्रस्तावित नविन इमारतीच्या बांधकामात व खोदकामात अडथळा निर्माण करीत आहेत.

**या प्रकरणी वर्तमान पत्रात जाहिरात' क्र. 45/PR अन्वये दिनांक 18.04.2025 ला जाहिरात प्रसिद्ध करून नागरिकांचे आक्षेप मागविण्यात आले असता प्रसिद्ध करण्यात आलेल्या जाहिरातीवर 5 नागरिकांचे आक्षेप प्राप्त झाले. त्यानुषंगाने दिनांक 13.05.2025 रोजी आक्षेपकर्त्यांची सुनावणी घेण्यात आली असून आक्षेपकर्त्यांनी खालीलप्रमाणे आक्षेप नोंदविले आहे.**

1. DP प्लान नुसार रिजर्वेशन तपासून इमारतीचे बांधकाम करावे.
2. या परिसरात वेगवेगळ्या इमारतीचे बांधकाम प्रस्तावित केले आहे. एकच इमारतीमध्ये सर्व कार्यालय व प्रशिक्षण केंद्रांचा समावेश करून Vetical इमारतीचे बांधकाम करावे.
3. परिसरात कोणतेही इमारतीचे बांधकामकरणे पूर्वी Environment Clearance घेणे आवश्यक असल्याने ह्याबाबत तपासणी करूनच Environment Clearance लागू असल्यास सादर करावे.

अर्जदारास सदर ठिकाणच्या नविन प्रस्तावित इमारतीच्या बांधकामात अडथळा निर्माण करणाऱ्या विविध प्रजातीच्या पुरातन (हेरीटेज) दोन व **नॉन हेरीटेज** 21 अशी एकूण 23 नग झाडाच्या मोबदल्यात नविन सावलीची 570 नग झाडांची लागवड करण्याबाबत पत्र देण्यात आले आहे. अर्जदाराने तोडण्यात

लिपिकांच्या प्रशिक्षणाकरीता नविन इमारतीच्या प्रस्तावित बांधकामात व खोदकामात अडथळा निर्माण करणाऱ्या विविध प्रजातीच्या **पुरातन (हेरीटेज)** 2 व **नॉन हेरीटेज** 21 अश्या एकूण 23 नग झाडाच्या मोबदल्यात **महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग पाच, जुलै 5, 2021/आषाढ 14, शके 1943 अन्वये प्रकरण 6 मुख्य अधिनियमाच्या कलम 8 मधील पोट कलम (4) (ब) अन्वये कापणी करण्यात येणाऱ्या त्याच जातीचे किंवा इतर कोणत्याही मूळ जातीचे कापणी करण्यात येणाऱ्या झाडाच्या अंदाजीत वयाइतक्या झाडाच्या संख्येइतकी किमान 6 फुट इतक्या उंचीची 570 नग नविन झाडांची लागवड करून सात वर्षे देखभाल करणे** या अटीचे पालन होण्यास्तव अर्जदाराकडून डिपॉझिट रु. 5,70,000/- व प्रशासकीय शुल्क रु. 57,000/- असे एकूण रु. 6,27,000/- रक्कम स्विकारण्याच्या अटीवर सदर ठिकाणी असलेली **पुरातन (हेरीटेज)** एक वड व **नॉन हेरीटेज** एक पिंपळ दोन नग झाडास प्रत्यारोपण करण्याची तसेच विविध प्रजातीची पुरातन एक व **नॉन हेरीटेज** 20 अशी एकूण 21 नग झाडास जमिनिपासून कापणी करण्याची समितीने एकमताने अनुमती प्रदान केली.

## विषय क्र. 3

कार्यालयास दिनांक 29.04.2025 ला प्राप्त श्री. सुभाष रामनाथ पारधी यांनी प्लॉट नं. 30, चंद्रशेखर आझाद चौक, मंगळवारी सी. ए. रोड, नागपूर येथील जागेवरील प्रस्तावित नविन इमारतीच्या बांधकामात अडथळा निर्माण करणाऱ्या एक पिंपळ प्रजातीच्या झाडाच्या तोडण्याची परवानगी मागितलेली आहे.

या प्रकरणी पाहणी करण्यात आली असता, प्लॉट नं. 30, चंद्रशेखर आझाद चौक, मंगळवारी सी. ए. रोड, नागपूर येथील जागेवर नविन इमारतीचे बांधकाम प्रस्तावित असून या ठिकाणी असलेले पुरातन (हेरीटेज) एक पिंपळ प्रजातीचे झाड अडथळा निर्माण करीत आहे.

**या प्रकरणी वर्तमान पत्रात जाहिरात क्र. 60/PR अन्वये दिनांक 24.04.2025 ला जाहिरात प्रसिद्ध करून नागरिकांचे आक्षेप मागविण्यात आले असता प्रसिद्ध करण्यात आलेल्या जाहिरातीवर नागरिकांचे आक्षेप प्राप्त झाले. त्यानुषंगाने दिनांक 15.05.2025 रोजी आक्षेपकर्त्यांची सुनावणी घेण्यात आली असून सदर झाड इमारतीच्या प्रत्यक्ष बांधकामात अडथळा निर्माण करीत असल्याने या झाडास कापणी करण्याबाबत कुठलेही हरकत नसल्याबाबत नोंदविले आहे.**

या प्रकरणी अर्जदारास सदर ठिकाणच्या नविन प्रस्तावित इमारतीच्या बांधकामात अडथळा निर्माण करणाऱ्या पुरातन (हेरीटेज) एक पिंपळ प्रजातीच्या झाडाच्या मोबदल्यात नविन सावलीची 139 नग झाडांची

a

लागवड करण्याबाबत पत्र देण्यात आले आहे. अर्जदाराने तोडण्यात येणाऱ्या झाडाच्या मोबदल्यात पर्यायी वृक्ष लागवड तक्षशिला निर्वाण घाट नारी, नागपूर या परिसरात 139 नग झाडांची लागवड केली आहे.

करीता प्लॉट नं. 30, चंद्रशेखर आझाद चौक, मंगळवारी सी. ए. रोड, नागपूर येथील जागेवरील प्रस्तावित नविन इमारतीच्या बांधकामात अडथळा निर्माण करणाऱ्या एक पिंपळ प्रजातीच्या झाडाच्या मोबदल्यात **महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग पाच, जुलै 5, 2021/आषाढ 14, शके 1943 अन्वये प्रकरण 6 मुख्य अधिनियमाच्या कलम 8 मधील पोट कलम (4) (ब) अन्वये कापणी करण्यात येणाऱ्या त्याच जातीचे किंवा इतर कोणत्याही मूळ जातीचे कापणी करण्यात येणाऱ्या झाडाच्या अंदाजीत वयाइतक्या झाडाच्या संख्येइतकी किमान 6 फुट इतक्या उंचीची 139 नग नविन झाडांची लागवड करून सात वर्षे देखभाल करणे** या अटीचे पालन होण्यास्तव अर्जदाराकडून डिपॉझिट रु. 1,39,000/- व प्रशासकीय शुल्क रु. 13,900/- असे एकूण रु. 1,52,000/- रक्कम स्विकारण्याच्या अटीवर सदर ठिकाणी असलेली **पुरातन (हेरीटेज)** एक पिंपळ झाडास प्रत्यारोपण करण्याची मंजुरी प्रदान करण्याच्या प्रश्नावर सभेमध्ये साधक बाधक चर्चा करण्यात आली.

अर्जदारातर्फे प्रत्यारोपण करण्यात येणाऱ्या पुरातन (हेरीटेज) एक पिंपळ झाडाच्या मोबदल्यात पर्यायी नविन सावलीची 139 नग वृक्ष तक्षशिला दहन घाट, नारी, नागपूर या परिसरात लावण्यात आली असून त्याचा मौका पाहणी अहवाल नस्तीस सलग्न आहे. लावण्यात आलेल्या 139 नग झाडांची 7 वर्ष देखभाल करणे या अटीचे पालन होण्यास्तव अर्जदाराकडून डिपॉझिट रु. 1,39,000/- व प्रशासकीय शुल्क रु. 13,900/- असे एकूण रु. 1,52,000/- रक्कम स्विकारण्याच्या अटीवर सदर ठिकाणच्या नविन इमारतीच्या बांधकामात अडथळा निर्माण करणाऱ्या **पुरातन (हेरीटेज)** एक पिंपळ झाडास प्रत्यारोपण करण्याची या समितीने एकमताने अनुमती प्रदान केली.

**विषय क्र. 4**

कार्यालयास दिनांक 26.07.2024 ला प्राप्त श्री. निर्मल सिंग नेगी, संयुक्त महाव्यवस्थापक, रेल्वे भूमी विकास प्राधिकरण नागपूर यांनी प्लॉट नं. 43, 44, 47, 52, 94, 107, 796 मौजा अजनी, धंतोली, नागपूर येथील अजनी रेल्वे क्वार्टर परिसरात नविन पार्किंग व इतर बांधकामात अडथळा निर्माण करणाऱ्या विविध प्रजातीच्या झाडास जमिनीपासून कापणी करण्याची परवानगी मागितलेली आहे.

या प्रकरणी पाहणी करण्यात आली असता, प्लॉट नं. 43, 44, 47, 52, 94, 107, 796 मौजा अजनी, धंतोली, नागपूर येथील अजनी रेल्वे क्वार्टर परिसरात नविन पार्किंग, Central FOB, East STP व West STP चे बांधकाम प्रस्तावित आहे.

या बांधकामात पुरातन (हेरीटेज) कडूनिम-2 व नॉन हेरीटेज आपटा-1, सागवन-1, जंगली करंजी-1. बदाम-2, केशिया-7, जास्वंद-2, सुबाभूळ-27, संत्रा 1, कटुंबर-6, फणस-1, लिंबू-6, बोर-1, जांभूळ-7. चिचबिलाई-10, कडूनिम-2, गुलमोहर-1, गोडनिम-1, आवळा-1, पेरू-10, सीताफळ-19, आंबा-27. सिसम-4, रेशीम धावडा-1, खिरणी-1, चिकू-1, मधुमालती-4, रिठा-1, शेवगा-4, बेल-4 नग अशी 154 नग वृक्ष, प्रत्यारोपण करण्यात येणारे नॉन हेरीटेज चाफा-19, परड-1, वड-2, उंबर-2 अशी एकूण 24 नग वृक्ष अश्या एकूण 180 नग वृक्ष व महुआ, आवळा व अशोका अशे एकूण 3 हेरीटेज झाडांच्या फांद्या बांधकामात अडथळा निर्माण करीत आहे.

या प्रकरणी वर्तमान पत्रात जाहिरात क्र. 347/PR अन्वये दिनांक 21.08.2024 ला जाहिरात प्रसिद्ध करून नागरिकांचे आक्षेप मागविण्यात आले आहे. दिनांक 27.08.2024 पर्यंत एकूण 80 आक्षेप प्राप्त झाले.

अजनी रेल्वे क्वार्टर परिसरात नविन पार्किंग व इतर बांधकामात अडथळा निर्माण करणाऱ्या पुरातन (हेरीटेज) 2 व नॉन हेरीटेज 154 नग वृक्षास व प्रत्यारोपण करण्यात येणाऱ्या 24 नग वृक्ष अश्या एकूण 180 नग वृक्षाच्या मोबदल्यात **महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग पाच, जुलै 5, 2021/आषाढ 14, शके 1943 अन्वये प्रकरण 6 मुख्य अधिनियमाच्या कलम 8 मधील पोट कलम (4) (ब) अन्वये कापणी करण्यात येणाऱ्या त्याच जातीचे किंवा इतर कोणत्याही मूळ जातीचे कापणी करण्यात येणाऱ्या झाडाच्या अंदाजीत वयाइतक्या झाडाच्या संख्येइतकी किमान 6 फुट इतक्या उंचीची 3475 नग नविन झाडांची लागवड करून सात वर्षे देखभाल करणे** या अटीचे पालन होण्यास्तव अर्जदाराकडून डिपॉझिट रु. 35,25,000/- व प्रशासकीय शुल्क रु. 3,54,000/- असे एकूण रु. 38,79,000/- रक्कम स्विकारण्याच्या अटीवर सदर ठिकाणच्या बांधकामात अडथळा निर्माण करणाऱ्या पुरातन (हेरीटेज) 2 नग वृक्षास, नॉन हेरीटेज 154 वृक्षास जमिनीपासून कापणी, 24 नग वृक्षास प्रत्यारोपण व पुरातन (हेरीटेज) 3 नग वृक्षांच्या फांद्या छाटणी करण्याबाबत मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ नागपूर PIL NO.15/2021 यांनी दिनांक 24.10.2024 रोजी आदेश पारित केला असून पृष्ठ क्र. 553 वर नस्तीमध्ये जोडला आहे. त्या अनुषंगाने ॲड. जे.बी. कासट यांनी पत्राद्वारे नागपूर महानगरपालिका नागपूरला दिलेल्या आदेशाबाबत लेखी स्वरुपात सूचना दिल्या आहेत. नस्ती पृष्ठ क्र. 792 वर जोडले आहेत तरी या विषयावर सखोल चर्चा करण्यात आली.

तोडण्यात येणाऱ्या झाडाच्या मोबदल्यात पर्यायी नवीन सावलीची विविध प्रजातीची 3475 नग वृक्षांची लागवड अजनी रेल्वे क्वार्टर परिसरात लावण्यात आली आहेत.

**विषय क्र.** 5

**अर्जदाराचे नाव :-** श्री. रविंद्र दुरगकर.

**अर्जाचा प्राप्त दिनांक :-** 24.02.2025

**झाडाची प्रजाती :-** रेनट्री, झाडाची गोलाई -113 इंच, झाडाची वय 110 वर्ष (हेरीटेज)

**झाडाचे विवरण :-** मोक्षधाम घाट रोड, अरुण बजाज बाजूला, नागपूर. येथील मेन रोडवर असलेल्या एक **पुरातन (हेरीटेज)** रेनट्री झाडाच्या इमारतीवर व रोडवर झुकलेल्या फांद्यांची छाटणी करण्याची मंजुरी प्रदान करण्याच्या विषयावर सभेत साधक बाधक चर्चा करण्यात आली. चर्चा होऊन वरील वृक्षाच्या इमारतीवर व रोडवर झुकलेल्या फांद्यांची छाटणी करण्याची समितीने एकमताने अनुमती प्रदान केली.

**विषय क्र.** 6

**अर्जदाराचे नाव :-** श्री. राहुल वाईकर

**अर्जाचा प्राप्त दिनांक :-** 02.03.2025

**झाडाची प्रजाती :-** पिंपळ, गोलाई- 157 इंच, झाडाची वय 153 वर्ष (हेरीटेज)

**झाडाचे विवरण :-** प्लॉट नं.48, रामेश्वरी बस स्टॉप, नागपूर. येथील मेनरोड वर परिसरात असलेल्या **पुरातन (हेरीटेज)** एक पिंपळ प्रजातीचे झाडाच्या रोडवर व परिसरात झुकलेल्या फांद्यांची छाटणी करणे आवश्यक असल्याने वरील वृक्षाच्या परिसरात व रोडवर झुकलेल्या फांद्याची छाटणी करण्याची समितीने एकमताने अनुमती प्रदान केली

**विषय क्र.** 7

**अर्जदाराचे नाव :-** श्री. श्रीराम पाठक

**अर्जाचा प्राप्त दिनांक :-** 14.05.2025

**झाडाची प्रजाती :-**पिंपळ, झाडाची गोलाई -139 इंच, झाडाची वय 134 वर्ष (हेरीटेज)

वड, झाडाची गोलाई -157 इंच, झाडाची वय 151 वर्ष (हेरीटेज)

**झाडाचे विवरण :-** प्लॉट नं. 171, सुभाषचंद्र बोस रोड आग्याराम देवी चौक नागपूर येथील श्री. श्रीराम पाठक यांच्या घरपरिसरात असलेल्या दोन **पुरातन (हेरीटेज)** पिंपळ, वड झाडाच्या इमारतीवर व रोडवर झुकलेल्या फांद्यांची छाटणी करणे आवश्यक असल्याने वरील वृक्षाच्या इमारतीवर व रोडवर झुकलेल्या फांद्याची छाटणी करण्याची समितीने एकमताने अनुमती प्रदान केली

**विषय क्र.** 8

**अर्जदाराचे नाव** :- श्री. डॉ. विनोद कृष्णराव गावंडे

**अर्जाचा प्राप्त दिनांक** :- 25.03.2025

**झाडाची प्रजाती** :-पेल्ट्राफार्म, झाडाची गोलाई -87 इंच, झाडाची वय 84 वर्ष (हेरीटेज)

**झाडाचे विवरण** :- प्लॉट नं.61 अजिंक्य सुयोगनगर रिंगरोड Indian Oil पेट्रोल पंप समोर नागपूर येथील मेन रोडवर असलेल्या एक **पुरातन (हेरीटेज)** पेल्ट्राफार्म झाडाच्या इमारतीवर व रोडवर झुकलेल्या फांद्यांची छाटणी करण्याची विषयावर सभेत साधक बाधक चर्चा करण्यात आली. चर्चा होऊन वरील इमारतीवर व रोडवर झुकलेल्या फांद्या छाटणी करण्याची समितीने एकमताने अनुमती प्रदान केली.

**विषय क्र. 9**

**अर्जदाराचे नाव** :- श्री. संजय देशमुख

**अर्जाचा प्राप्त दिनांक** :- 05.05.2025

**झाडाची प्रजाती** :- आंबा, झाडाची गोलाई -74 इंच, झाडाचे वय - 72 वर्ष (हेरीटेज)

**झाडाचे विवरण** :- एफ-2, को-ऑपरेटीव्ह हाऊसिंग सोसायटी तात्या टोपे नगर, नागपूर येथिल खाजगी ठिकाणी एक आंबा **(हेरीटेज)** प्रजातीच्या झाडाच्या फांद्या घरपरिसरात व रस्त्यावर धोकादायाकरीत्या झुकलेल्या आहे, झुकलेल्या फांद्या छाटणी करण्याची अनुमती प्रदान करण्याच्या विषयावर चर्चा करण्यात आली. चर्चेअंती वरील वृक्षांच्या घरपरिसरात व रस्त्यावर झुकलेल्या फांद्या कापणी करण्याची समितीने एकमताने अनुमती प्रदान केली.

**विषय क्र. 10**

**अर्जदाराचे नाव** :- श्री. विशेष पोलीस महानिरीक्षक (कारागृह)

**अर्जाचा प्राप्त दिनांक** :- 14.05.2025

**झाडाची प्रजाती** :- कडुलिंब, झाडाची गोलाई -87 इंच, झाडाचे वय - 83 वर्ष (हेरीटेज)

**झाडाचे विवरण** :- कारागृह, कार्यालय, पूर्व विभाग, नागपूर येथिल शासकीय ठिकाणी एक कडुलिंब **(हेरीटेज)** प्रजातीच्या वृक्षाच्या फांद्या इमारतीवर धोकादायाकरीत्या झुकलेल्या आहे. झुकलेल्या फांद्या छाटणी करणे आवश्यक असल्याने वरील वृक्षाच्या इमारतीवर धोकादायाकरीत्या झुकलेल्या फांद्याची छाटणी करण्याची समितीने एकमताने अनुमती प्रदान केली.

**विषय क्र. 11**

**अर्जदाराचे नाव** :- श्री. लक्ष्मीकांत पितळे

**अर्जाचा प्राप्त दिनांक :-** 20.05.2025

**झाडाची प्रजाती :-** पेल्ट्राफार्म झाडाची गोलाई - 58 इंच, झाडाचे वय - 56 वर्ष (हेरीटेज)

**झाडाचे विवरण :-** प्लॉट नं 4, समोर भाऊसाहेब सुर्वे नगर, जयताळा रोड, नागपूर येथिल म.न.पा. ठिकाणी **एक पेल्ट्राफार्म (हेरीटेज)** प्रजातीच्या वृक्षाच्या फांद्या इमारतीवर व परिसरात धोकादायाकरीत्या झुकलेल्या फांद्या छाटणी करणे आवश्यक असल्याने वरील वृक्षाच्या इमारतीवर धोकादायाकरीत्या झुकलेल्या फांद्याची छाटणी करण्याची समितीने एकमताने अनुमती प्रदान केली.

**विषय क्र.** 12

**अर्जदाराचे नाव :-** श्री. मंगल बडगे,

**अर्जाचा प्राप्त दिनांक :-** 10.3.2025

**झाडाची प्रजाती :-** पिंपळ -1, झाडाची गोलाई - 75 इंच, झाडाची वय 72 वर्ष (हेरीटेज)

**प्रशाकीय शुल्क :-** 500/-

**झाडाचे विवरण :-** प्लॉट नं 3524, इटा भटी चौक जवळ, नागपूर येथिल असलेल्या एक **पुरातन (हेरीटेज)** पिंपळ एकूण 01 झाडाच्या घरांवर व परीसरात झुकलेल्या फांद्यांची छाटणी करणे आवश्यक असल्याने वरील वृक्षाच्या इमारतीवर धोकादायाकरीत्या झुकलेल्या फांद्याची छाटणी करण्याची समितीने एकमताने अनुमती प्रदान केली.

**विषय क्र.** 13

**अर्जदाराचे नाव :-** श्री. हरीदास वि बनकर ,

**अर्जाचा प्राप्त दिनांक :-** 21.3.2025

**झाडाची प्रजाती :-** रेन्ट्री -1, झाडाची गोलाई - 80 इंच, झाडाची वय 77 वर्ष (हेरीटेज)

**झाडाचे विवरण :-** प्लॉट नं. 1470, वैशाली नगर, स्टेट बँक जवळ, नागपूर येथिल असलेल्या एक **पुरातन (हेरीटेज)** रेन्ट्री एकूण 01 वृक्षाच्या घरांवर व परीसरात झुकलेल्या फांद्यांची छाटणी करण्याची अनुमती प्रदान करण्याच्या विषयावर चर्चा करण्यात आली. चर्चेअंती वरील वृक्षाच्या घरपरिसरात झुकलेल्या फांद्या कापणी करण्याची समितीने एकमताने अनुमती प्रदान केली.

**विषय क्र.** 14

**अर्जदाराचे नाव :-** श्री. मनोज लोखंडे,

**अर्जाचा प्राप्त दिनांक :-** 29.4.2025

**झाडाची प्रजाती :-** पिंपळ -1, झाडाची गोलाई - 120 इंच, झाडाची वय 115 वर्ष (हेरीटेज)

**झाडाचे विवरण :-** शांतीकुंज, हॉउसिंग सोसा., शांतीनगर घाट चौक, शिव रेस्टॉरेंट च्या समोर, नागपूर येथिल असलेल्या एक **पुरातन (हेरीटेज)** पिंपळ एकूण 01 झाडाच्या घरांवर व परीसरात झुकलेल्या फांद्यांची छाटणी करण्याची अनुमती प्रदान करण्याच्या विषयावर चर्चा करण्यात आली. चर्चेअंती वरील वृक्षाच्या घरपरिसरात झुकलेल्या फांद्या कापणी करण्याची समितीने एकमताने अनुमती प्रदान केली.

**विषय क्र. 15**

**अर्जदाराचे नाव :-** श्री. अलोक कुमार सिन्हा,

**अर्जाचा प्राप्त दिनांक :-** 07.03.2025

**झाडाची प्रजाती :-** पिंपळ -1, झाडाची गोलाई - 70 इंच, झाडाची वय 66 वर्ष (हेरीटेज)

शेमल-1, झाडाची गोलाई - 65 इंच, झाडाची वय 62 वर्ष (हेरीटेज)

कडुनीम -1, झाडाची गोलाई - 20 इंच, झाडाची वय 19 वर्ष (हेरीटेज)

**झाडाचे विवरण :-** प्लॉट नं. 257, बंगाली असोशीएशन, धंतोली झोन नं. 4 मागे, धंतोली, नागपूर येथिल असलेल्या एक **पुरातन (हेरीटेज) पिंपळ, सेमल, कडूनीम (नॉ. हे.) एकूण 03** झाडाच्या घरांवर व परीसरात झुकलेल्या फांद्यांची छाटणी करण्याची अनुमती प्रदान करण्याच्या विषयावर चर्चा करण्यात आली. चर्चेअंती वरील वृक्षाच्या घरपरिसरात झुकलेल्या फांद्या कापणी करण्याची समितीने एकमताने अनुमती प्रदान केली.

**विषय क्र. 16**

**अर्जदाराचे नाव :-** श्री. लहुकुमार बेहाते (माजी नगरसेवक)

**अर्जाचा प्राप्त दिनांक :-** 09.04.2025

**झाडाची प्रजाती :-** वड-1, झाडाची गोलाई - 65 इंच, झाडाची वय 61 वर्ष (हेरीटेज)

**झाडाचे विवरण :-** राजीव गांधी गार्डन रोड, त्रीमुर्ती नगर, नागपूर येथिल रस्त्यालगत असलेल्या एक **पुरातन (हेरीटेज) वड** एकूण 01 वृक्षाच्या रस्त्यावर व परीसरात झुकलेल्या फांद्यांची कापणी करण्याची आवश्यकता असल्याने एक वडाच्या वृक्षाच्या रस्त्यावर व परीसरात झुकलेल्या फांद्यांची छाटणी करणे आवश्यक असल्याने वरील वृक्षाच्या रस्त्यावर व परीसरात झुकलेल्या फांद्याची छाटणी करण्याची समितीने एकमताने अनुमती प्रदान केली.

**विषय क्र. 17**

**अर्जदाराचे नाव :-** श्री. संजय गोविंदराव काटवे,

**अर्जाचा प्राप्त दिनांक :-** 04.02.2025

**झाडाची प्रजाती :- पिंपळ -1, झाडाची गोलाई - 68 इंच, झाडाची वय** 65 **वर्ष (हेरीटेज)**

**झाडाचे विवरण :-** महादेव मंदीर, शोभाखेत, पाचपावली, नागपूर येथिल परीसरातील असलेल्या एक **पुरातन (हेरीटेज) पिंपळ एकूण** 01 झाडाच्या रस्त्यावर व बाजूच्या घरांवर झुकलेल्या फांद्यांची छाटणी करणे आवश्यक असल्याने वरील वृक्षाच्या रस्त्यावर व बाजूच्या घरांवर झुकलेल्या फांद्याची छाटणी करण्याची समितीने एकमताने अनुमती प्रदान केली.

**विषय क्र. 18**

**अर्जदाराचे नाव :-** श्री. जयप्रकाश शाहू,

**अर्जाचा प्राप्त दिनांक :-** 11.03.2025

**झाडाची प्रजाती :-** वड -1, झाडाची गोलाई - 250 इंच, झाडाची वय 240 वर्ष (हेरीटेज)

**झाडाचे विवरण :-** जागनाथ बुधवारी, भगवान सोडा फॅक्टरी, नागपूर. येथिल परीसरातील असलेल्या एक **पुरातन (हेरीटेज)** वड वृक्षाच्या रस्त्यावर व बाजूच्या घरांवर झुकलेल्या फांद्यांची छाटणी करणे आवश्यक असल्याने वरील वृक्षाच्या रस्त्यावर व बाजूच्या घरांवर झुकलेल्या फांद्याची छाटणी करण्याची समितीने एकमताने अनुमती प्रदान केली.

**विषय क्र. 19**

**अर्जदाराचे नाव :-** शैलेश जैन.

**अर्जाचा प्राप्त दिनांक :-** ०३.०२.२०२२

**झाडाची प्रजाती :-** १) पिंपळ-१, झाडाची गोलाई- १४५ इंच, झाडाचे वय- १४१ वर्ष (हेरीटेज).

२) कडूनिंब-१ , झाडाची गोलाई- ८५ इंच, झाडाचे वय- ८२ वर्ष (हेरीटेज)

**झाडाचे विवरण :-** प्लॉट नं. ३११ आझाद चौक,सदर नागपूर येथील रोडलगत फुटपाथवर असलेया एक पिंपळ (हेरीटेज), व एक कडूनिंब वृक्षाच्या इमारतीवर धोकादयाकरित्या झुकलेल्या वृक्षाच्या फांद्याची छाटणी करणे आवश्यक असल्याने वरील वृक्षाच्या इमारतीवर धोकादयाकरित्या झुकलेल्या फांद्याची छाटणी करण्याची समितीने एकमताने अनुमती प्रदान केली.

**विषय क्र. 20**

**अर्जदाराचे नाव :-** श्री. लोकेश बनराखे

**अर्जाचा प्राप्त दिनांक :-** ११.०२.२०२५

**झाडाची प्रजाती :-** चिंच -१, झाडाची गोलाई- १४० इंच, झाडाचे वय- १३६ वर्ष (हेरीटेज).

**झाडाचे विवरण :-** प्लॉट नं. ३१३२ हनुमान मंदिर, नारा, नागपूर येथील रोड परिसरात फुटपाथ वर असलेल्या एक चिंच प्रजातीच्या झाडाचा फांद्या घरपरिसरात झुकलेल्या फांद्याची छाटणी करण्याची अनुमती प्रदान करण्याच्या विषयावर चर्चा करण्यात आली. चर्चेअंती वरील वृक्षाच्या घरपरिसरात झुकलेल्या फांद्या कापणी करण्याची समितीने एकमताने अनुमती प्रदान केली.

**विषय क्र. 21**

**अर्जदाराचे नाव :-** एस.जि.हेल्थ केयर पि.वि.टी.

**अर्जाचा प्राप्त दिनांक :-** १६.०४.२०२५

**झाडाची प्रजाती :-** १) सप्तपर्णी-१, झाडाची गोलाई-६८ इंच, झाडाचे वय-६६ वर्ष (हेरीटेज).

२) आंबा-१, झाडाची गोलाई-७९ इंच, झाडाचे वय-७७ वर्ष (हेरीटेज)

**प्रशाकीय शुल्क :-** १,०००/-

**झाडाचे विवरण :-** प्लॉट नं. २४६, मोहन नगर, टेंट लाईन रोड, नागपूर येथील इमारतीच्या परिसारत असलेल्या एक आंबा (हेरीटेज) व एक सप्तपर्णी प्रजातीच्या वृक्षाच्या इमारतीवर झुकलेल्या फांद्याची छाटणी करण्याची अनुमती प्रदान करण्याच्या विषयावर चर्चा करण्यात आली. चर्चेअंती वरील वृक्षाच्या इमारतीवर झुकलेल्या फांद्या कापणी करण्याची समितीने एकमताने अनुमती प्रदान केली.

**विषय क्र. 22**

**अर्जदाराचे नाव :-** श्री. निशा रामटेके

**अर्जाचा प्राप्त दिनांक :-** १७.०४.२०२५

**झाडाची प्रजाती :-** पिंपळ -१, झाडाची गोलाई- 55 इंच, झाडाचे वय- 53 वर्ष (हेरीटेज).

**प्रशाकीय शुल्क :-** ५००/-

**झाडाचे विवरण :-** घर क्र.५८, आंबेडकर नगर बेझानबाग, नागपूर. येथिल प्रमोद रामटेके यांच्या घरपरिसारत एक पिंपळ प्रजातीच्या (हेरिटेज) वृक्षाच्या अर्जदाराच्या इमारतीवर झुकलेल्या फांद्याची छाटणी करण्याची मंजुरी प्रदान करण्याच्या विषयावर सभेत साधक बाधक चर्चा करण्यात आली. चर्चा होऊन वरील वृक्षाच्या इमारतीवर झुकलेल्या फांद्यांची छाटणी करण्याची समितीने एकमताने अनुमती प्रदान केली.

**विषय क्र. 23**

**अर्जदाराचे नाव :-** श्री. विरेन्द्र कुकरेजा.

**अर्जाचा प्राप्त दिनांक :-** १३.०५.२०२५

**झाडाची प्रजाती :-** १) कडूनिंब -३, झाड गोलाई:- ३५-६५ इंच, झाडाचे वय:-३२-६३ वर्ष (हेरीटेज).

२)पिंपळ -१ झाड गोलाई:-१००-१५० इंच, झाडाचे वय:-९७-१४५वर्ष (हेरीटेज).

३)केशिया -२ झाड गोलाई:- ४४-५९ इंच, झाडाचे वय:-४२-५७ वर्ष (हेरीटेज).

४) सूबाबूळ-२ झाड गोलाई:-२७-५० इंच, झाडाचे वय:- वर्ष (हेरीटेज).

५) गुलमोहर-१ झाड गोलाई:-५६ इंच, झाडाचे वय:-५४ वर्ष (हेरीटेज).

**झाडाचे विवरण :-** मंगळवारी झोन क्र. 10 अंतर्गत येत असलेल्या प्रभाग क्र. १, अंतर्गत येत असलेल्या विविध ठिकाणी असलेल्या नागरिकांच्या घरपरिसरात व रोडलगत असलेल्या वर नमूद विविध प्रजातीच्या झाडाचा घरपरिसारत व रोड परिसरात झुकलेल्या फांद्याची छाटणी करण्याची मंजुरी प्रदान करण्याच्या विषयावर सभेत साधक बाधक चर्चा करण्यात आली. चर्चा होऊन वरील वृक्षाच्या इमारतीवर झुकलेल्या फांद्यांची छाटणी करण्याची समितीने एकमताने अनुमती प्रदान केली

**विषय क्र. 24**

**अर्जदाराचे नाव :-** श्री. रजनीश सिंग.

**अर्जाचा प्राप्त दिनांक :-** १८.०५.२०२५

**झाडाची प्रजाती :-** महारुख:-१, झाडाची गोलाई :- ८९ इंच, झाडाचे वय:- ८६ वर्ष (हेरीटेज).

**झाडाचे विवरण :-**प्लॉट नं ३९, शिला नगर , काटोल रोड , नागपूर. येथिल मंदिरा च्या परिसरात एक महारुख प्रजातीच्या (हेरीटेज) वृक्षाच्या फांद्या वृक्षाच्या धोकादयाकरित्या रोड परिसरात झुकलेल्या फांद्याची छाटणी करण्याची मंजुरी प्रदान करण्याच्या विषयावर सभेत साधक बाधक चर्चा करण्यात आली. चर्चा होऊन वरील वृक्षाच्या वृक्षाच्या धोकादयाकरित्या रोड परिसरात फांद्यांची छाटणी करण्याची समितीने एकमताने अनुमती प्रदान केली.

**विषय क्र. 25**

**अर्जदाराचे नाव :-** श्री. संदीप प्रमोद रांगणे

**अर्जाचा प्राप्त दिनांक :-** १७.०२.२०२५

**झाडाची प्रजाती :-** पिंपळ:१, झाडाची गोलाई-७५ इंच, झाडाचे वय- ७३ वर्ष ((हेरीटेज).

**प्रशाकीय शुल्क :-** ५००/-

**झाडाचे विवरण :-** प्लॉट नं ५३०, ब्लॉक नं. १, इंदोरा बुद्ध विहार, इंदोरा नागपूर येथिल घर परिसरात असलेल्या एक पिंपळ प्रजातीच्या (हेरिटेज) वृक्षाच्या धोकादयाकरित्या घरपरिसरात झुकलेल्या फांद्याची छाटणी करण्याची अनुमती प्रदान करण्याच्या विषयावर चर्चा करण्यात आली. चर्चेअंती वरील वृक्षाच्या इमारतीवर झुकलेल्या फांद्या छाटणी करण्याची समितीने एकमताने अनुमती प्रदान केली.

**विषय क्र. 26**

**अर्जदाराचे नाव :-** श्री. राम कुशल दिवाणी

**अर्जाचा प्राप्त दिनांक :-** ०९.०१.२०२५

**झाडाची प्रजाती :-** 1) आंबा-१, झाडाची गोलाई-५३ इंच, झाडाची वय- ५१ वर्ष (हेरीटेज).

**प्रशाकीय शुल्क :-** 500/-

**झाडाचे विवरण :-** प्लॉट नं. २४. गंगा हाउसिंग सोसायटी , सुरेन्द्र्गड, सेमिनरी हिल्स, नागपूर येथील घर परिसरात असलेल्या एक आंबा प्रजातीच्या (हेरीटेज) झाडांच्या धोकादयाकरित्या घरपरिसरात झुकलेल्या फांद्याची छाटणी करण्याची अनुमती प्रदान करण्याच्या विषयावर चर्चा करण्यात आली. चर्चेअंती वरील (हेरीटेज) वृक्षाच्या धोकादयाकरित्या घरपरिसरात झुकलेल्या फांद्या छाटणी करण्याची समितीने एकमताने अनुमती प्रदान केली.

**विषय क्र. 27**

**अर्जदाराचे नाव :-** श्रीमती. राखी भाटीया

**अर्जाचा प्राप्त दिनांक :-** २४.०८.२०२४

**झाडाची प्रजाती :-** १) पिंपळ-१, झाडाची गोलाईः-८५ इंच, झाडाची वयः-८३ वर्ष (हेरीटेज).

**प्रशाकीय शुल्क :-** ५००/-

**झाडाचे विवरण :-** जे.पि अपारमेंट, गोंडवाना चौक, मंगळवारी झोन रोड, नागपूर येथील J.P अपारमेंट च्या परिसरात असलेल्या एक पिंपळ (हेरीटेज) वृक्षाच्या धोकादयाकरित्या इमारतीवर झुकलेल्या फांद्याची छाटणी करण्याची अनुमती प्रदान करण्याच्या विषयावर चर्चा करण्यात आली. चर्चेअंती वरील (हेरीटेज) वृक्षाच्या धोकादयाकरित्या इमारतीवर झुकलेल्या फांद्या छाटणी करण्याची समितीने एकमताने अनुमती प्रदान केली.

**विषय क्र. 28**

**अर्जदाराचे नाव :-** श्रीमती. रेखा बनसोड.

**अर्जाचा प्राप्त दिनांक :-** २०.०८.२०२४

**झाडाची प्रजाती :-** पिंपळ:-१, झाडाची गोलाई- ८७ इंच, झाडाची वय:-८४ वर्ष (हेरीटेज).

**झाडाचे विवरण :-** प्लॉट नं. 110, हजारी पहाड, नागपूर येथील मंदिराच्या परिसरात असलेल्या एक पिंपळ (हेरीटेज) वृक्षाच्या धोकादयाकरित्या इमारतीवर झुकलेल्या फांद्याची छाटणी करण्याची मंजुरी प्रदान करण्याच्या विषयावर सभेत साधक बाधक चर्चा करण्यात आली. चर्चा होऊन वरील वृक्षाच्या धोकादयाकरित्या धोकादयाकरित्या इमारतीवर फांद्यांची छाटणी करण्याची समितीने एकमताने अनुमती प्रदान केली.

**विषय क्र. 29**

**अर्जदाराचे नाव :-** श्री. समिर राय

**अर्जाचा प्राप्त दिनांक :-** ०१.०३.२०२५

**झाडाची प्रजाती :-** आंबा -२, झाडाची गोलाई- ९५-११० इंच, झाडाची वय:-९१-१०६वर्ष (हेरीटेज).
कडूनिम :-१, झाडाची गोलाई- ८७ इंच, झाडाची वय:-८४ वर्ष (हेरीटेज).
करंजी :-१, झाडाची गोलाई- ८४ इंच, झाडाची वय:- ८१वर्ष (हेरीटेज).
सिसम:-१, झाडाची गोलाई- ६७ इंच, झाडाची वय:- ६५वर्ष (हेरीटेज).
आडजात :-१, झाडाची गोलाई- ८६ इंच, झाडाची वय:- ८३वर्ष (हेरीटेज).

**झाडाचे विवरण :-** द्रिवेदी कॉलनी, दिनशा डेरी,गिट्टी खदान, काटोल रोड, नागपूर येथील परिसरात असलेल्या विविध प्रजातीच्या 06 नग (हेरीटेज) वृक्षाच्या धोकादयाकरित्या इमारतीवर झुकलेल्या फांद्याची छाटणी करणे आवश्यक असल्याने वरील वृक्षाच्या इमारतीवर धोकादयाकरित्या झुकलेल्या फांद्याची छाटणी करण्याची समितीने एकमताने अनुमती प्रदान केली.

**विषय क्र. 30**

**अर्जदाराचे नाव :-** श्री. समीर रॉय

**अर्जाचा प्राप्त दिनांक :-** २०.०८.२०२४

**झाडाची प्रजाती :-** वड:- १, झाडाची गोलाई- ९५ इंच, झाडाची वय:- ९१ वर्ष (हेरीटेज).

**झाडाचे विवरण :-** दिनशॉ फॅक्टरी, गोरेवाडा रोड, नागपूर येथील परिसरात असलेल्या एक वड वृक्षाच्या धोकादयाकरित्या रोडवर व इमारतीवर झुकलेल्या फांद्या करणे आवश्यक असल्याने वरील वृक्षाच्या इमारतीवर धोकादयाकरित्या झुकलेल्या फांद्याची छाटणी करण्याची समितीने एकमताने अनुमती प्रदान केली.

विषय क्र. 31

**अर्जदाराचे नाव :-** श्री. वृक्ष संवर्धक

**अर्जाचा प्राप्त दिनांक :-** २०.०८.२०२४

**झाडाची प्रजाती :-** वड-७ झाडाची गोलाई- ११०-१८० इंच, झाडाची वयः- १०४-१७३वर्ष (हेरीटेज

**झाडाचे विवरण :-** काटोल नाका, काटोल रोड, नागपूर येथील फुटपाथ वर असलेल्या सात वड वृक्षाच्या धोकादयाकरित्या रोडवर झुकलेल्या फांद्या छाटणी करण्याची मंजुरी प्रदान करण्याच्या विषयावर सभेत साधक बाधक चर्चा करण्यात आली. चर्चा होऊन वरील वृक्षाच्या धोकादयाकरित्या रोडवर खाली झुकलेल्या फांद्यांची छाटणी करण्याची समितीने एकमताने अनुमती प्रदान केली.

विषय क्र. 32

**अर्जदाराचे नाव :-** श्री. प्रशांत रामटेके

**अर्जाचा प्राप्त दिनांक :-** 06 .05.२०२५

**झाडाची प्रजाती :-** आंबा -५ झाडाची गोलाई- ४०ते १२०इंच, झाडाची वयः- ३८-११६वर्ष (हेरीटेज

पिंपळ- १झाडाची गोलाई- १४५ इंच, झाडाची वयः- १३९वर्ष (हेरीटेज

करंजी -१ झाडाची गोलाई- ५९ इंच, झाडाची वय-५७ वर्ष (हेरीटेज

अशोका -२झाडाची गोलाई- ४५-८० इंच, झाडाची वय- ४३-७७वर्ष (हेरीटेज

**झाडाचे विवरण :-** बोरगाव, गोरेवाड वस्ती, गोरेवाड रोड, नागपूर येथील परिसरात असलेल्या विविध प्रजातीच्या 06 नग (हेरीटेज) वृक्षांच्या धोकादयाकरित्या इमारतीवर झुकलेल्या फांद्याची छाटणी करणे आवश्यक असल्याने वरील वृक्षांच्या इमारतीवर धोकादयाकरित्या झुकलेल्या फांद्याची छाटणी करण्याची समितीने एकमताने अनुमती प्रदान केली.

विषय क्र. 33

**अर्जदाराचे नाव :-** श्री. एस. आर. यादव

**अर्जाचा प्राप्त दिनांक :-**20.02.2025

**झाडाची प्रजाती :-** कडूनिंब-1, झाडाची गोलाई -83 इंच, झाडाची वय -80 वर्ष (हेरीटेज)

केशिया-1, झाडाची गोलाई -51 इंच, झाडाची वय -49 वर्ष (हेरीटेज)

**झाडाचे विवरण :-** हाउस नं. 572/ सी. 47, सुरेंद्रगढ, सेमिनरी हिल्स, नागपूर येथील सुरक्षाभिंतीलगत असलेल्या **पुरातन (हेरीटेज)** एक कडूनिंब व एक केशिया झाडाच्या अर्जदाराच्या इमारतीवर व शेजारी

इमारतीवर झुकलेल्या फांद्यांची छाटणी करणे आवश्यक असल्याने समितीने झाडाच्या फांद्या छाटणी छाटणी करण्याची एकमताने अनुमती प्रदान केली.

### विषय क्र. 34

**अर्जदाराचे नाव :-** श्री. विशाल गायकवाड

**अर्जाचा प्राप्त दिनांक :-** 21.05.2025

**झाडाची प्रजाती :-** चिंच-2, झाडाची गोलाई -74-104 इंच, झाडाची वय 72-98 वर्ष (हेरीटेज)

**झाडाचे विवरण :-** सेंट उर्सुला गर्ल्स स्कूल मागे, सिव्हिल लाईन्स, नागपूर येथील परिसरात असलेल्या असलेल्या **पुरातन (हेरीटेज)** दोन चिंच झाडाच्या इमारतीवर व रोडवर धोकादायकरित्या झुकलेल्या फांद्यांची छाटणी करण्याची मंजुरी प्रदान चर्चा करण्यात आली. सदर रोडवर स्कूल बसेची वाहतूक मोठ्या प्रमाणात असल्याने अपघात करण्याच्या प्रश्नावर सभेत होऊ नये याकरिता समितीने सदर झाडाच्या झुकलेल्या फांद्या छाटणी करण्याची एकमताने अनुमती प्रदान केली.

### विषय क्र. 35

**अर्जदाराचे नाव :-** श्री. विजय कुर्यवंशी

**अर्जाचा प्राप्त दिनांक :-** 19.03.2025

**झाडाची प्रजाती :-** पिंपळ-1, झाडाची गोलाई -150 इंच, झाडाची वय 146 वर्ष (हेरीटेज)

**झाडाचे विवरण :-** भाजी मंडी चौक, सिताबर्डी, नागपूर येथील परिसरात असलेल्या **पुरातन (हेरीटेज)** एक पिंपळ झाडाच्या इमारतीवर व रोडवर धोकादायकरित्या झुकलेल्या फांद्यांची छाटणी करण्याची समितीने एकमताने अनुमती प्रदान केली.

### विषय क्र. 36

**अर्जदाराचे नाव :-** उद्यान अधीक्षक, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर

**अर्जाचा प्राप्त दिनांक :-** 31.05.2025

**झाडाची प्रजाती :-** कडूनिम-4, झाडाची गोलाई -52-92 इंच, झाडाची वय -50-87 वर्ष (हेरीटेज)

आंबा-1, झाडाची गोलाई -95 इंच, झाडाची वय -91 वर्ष (हेरीटेज)

पेल्ट्राफार्म-9, झाडाची गोलाई -52-76 इंच, झाडाची वय -50-74 वर्ष (हेरीटेज)

केशिया-1, झाडाची गोलाई -54 इंच, झाडाची वय -52 वर्ष (हेरीटेज)

फणस-1, झाडाची गोलाई -90 इंच, झाडाची वय -88 वर्ष (हेरीटेज)

**प्रशासकीय शुल्क :-** रु. 8,000/-

**झाडाचे विवरण :-** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, अमरावती रोड, नागपूर येथील परिसरात असलेल्या विविध प्रजातीच्या **पुरातन (हेरीटेज)** वर नमूद 16 नग झाडाच्या व मुलांच्या, मुलींच्या वस्तीगृहाच्या छतावर व परीसरात झुकलेल्या फांद्यांची छाटणी करण्याची मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्नावर सभेत चर्चा करण्यात आली. चर्चे अंती परिसरात विद्यार्थ्यांची व कर्मचाऱ्यांची वर्दळ मोठ्या प्रमाणात असल्याने व सद्या पावसाचे दिवस लक्षात घेता उक्त झाडाच्या फांद्या पडून कुठलीही वित्त हानी किंवा अपघात होऊ नये. याकरिता समितीने वरील झाडांच्या झुकलेल्या फांद्या छाटणी करण्याची एकमताने अनुमती प्रदान केली.

**विषय क्र. 37**

**अर्जदाराचे नाव :-** श्री. ताप कुमार प्रसाद

**अर्जाचा प्राप्त दिनांक :-** 19.03.2025

**झाडाची प्रजाती :-** पिंपळ-1, झाडाची गोलाई -210 इंच, झाडाची वय -205 वर्ष (हेरीटेज)

**झाडाचे विवरण :-** अमरावती रोड, नागपूर येथील वसंतराव नाईक झोपडपट्टी येथील परिसरात असलेल्या पुरातन (हेरीटेज) एक पिंपळ झाडाच्या अर्जदाराच्या घराच्या छतावर धोकादायकरित्या झुकलेल्या फांद्यांची छाटणी करण्याची आवश्यकता असल्याने समितीने एकमताने अनुमती प्रदान केली.

**विषय क्र. 38**

**अर्जदाराचे नाव :-** एस. टी. हरकटे

**अर्जाचा प्राप्त दिनांक :-** 19.03.2025

**झाडाची प्रजाती :-** रेनट्री-2, झाडाची गोलाई -175-190 इंच, झाडाची वय -170-187 वर्ष (हेरीटेज)

**झाडाचे विवरण :-** काचीपुरा उद्यान, रामदासपेठ, नागपूर येथील सुरक्षाभिंतीलगत असलेल्या **पुरातन (हेरीटेज)** दोन रेनट्री झाडाच्या विद्युत तारेवर व रोडवर झुकलेल्या फांद्यांची छाटणी करण्याची आवश्यकता असल्याने समितीने सदर झाडाच्या झुकलेल्या फांद्या छाटणी करण्याची अनुमती प्रदान केली.

**विषय क्र. 39**

**अर्जदाराचे नाव :-** श्रीमती. रूपा जंगारे

**अर्जाचा प्राप्त दिनांक** :-27.05.2025

**झाडाची प्रजाती** :- उंबर-1, झाडाची गोलाई -115 इंच, झाडाची वय -110 वर्ष (हेरीटेज)

आंबा-1, झाडाची गोलाई -102 इंच, झाडाची वय -98 वर्ष (हेरीटेज)

अशोका-4, झाडाची गोलाई -15-50 इंच, झाडाची वय-14-48 वर्ष (नॉन हेरीटेज)

**प्रशासकीय शुल्क** :- रु. 3,000/-

**झाडाचे विवरण** :- प्लॉट नं. 6, साई वैष्णव अपार्टमेंट, टिळक नगर, नागपूर येथील घरपरिसरात असलेल्या वर नमुद झाडाच्या इमारतीकडील बाजूस व परिसरात झुकलेल्या फांद्या छाटणी करण्याची मंजुरी प्रदान चर्चा करण्यात आली. चर्चे दरम्यान वर नमुद झाडाच्या इमारतीकडील बाजूस व परिसरात झुकलेल्या फांद्या छाटणी करण्याची समितीने एकमताने अनुमती प्रदान केली.

**विषय क्र.** 40

**अर्जदाराचे नाव** :- श्री. अमोल मोकाटे

**अर्जाचा प्राप्त दिनांक** :-22.05.2025

**झाडाची प्रजाती** :- गुलमोहर-4, गोलाई -54,57,71,71 इंच, झाडाची वय -52,55,69,69, वर्ष (हेरीटेज)

रेन-ट्री , झाडाची गोलाई -79 इंच, झाडाची वय -76 वर्ष (हेरीटेज)

**झाडाचे विवरण** :- प्राईड हॉटेल, एअर पोर्ट समोर, वर्धा रोड, नागपूर येथील सुरक्षाभिंतीलगत असलेल्या **पुरातन (हेरीटेज)** चार गुलमोहर, एक रेनट्री व एक आंबा झाडाच्या अर्जदाराच्या इमारतीवर व रोडवर झुकलेल्या फांद्यांची छाटणी करण्याची मंजुरी प्रदान करण्याच्या विषयावर सभेत साधक बाधक चर्चा करण्यात आली. चर्चा होऊन वरील झाडाच्या इमारतीवर व रोडवर खाली झुकलेल्या फांद्यांची छाटणी करण्याची समितीने एकमताने अनुमती प्रदान केली.

**विषय क्र.** 41

**अर्जदाराचे नाव** :- श्री. राहुल प्रकाश सोनी

**अर्जाचा प्राप्त दिनांक** :-03.06.2025

**झाडाची प्रजाती** :- निलगिरी-1, झाडाची गोलाई -95 इंच, झाडाची वय -92 वर्ष (हेरीटेज)

**झाडाचे विवरण** :- प्लॉट नं.74, श्री निवास, दगडी पार्क जवळ, नागपूर येथील सुरक्षाभिंतीलगत असलेल्या **पुरातन (हेरीटेज)** एक निलीगिरी झाडाच्या अर्जदाराच्या इमारतीवर झुकलेल्या फांद्यांची छाटणी करण्याची आवश्यकता असल्याने समितीने एकमताने अनुमती प्रदान केली.

**विषय क्र. 42**

**अर्जदाराचे नाव :-** श्री. पाशा खान पठाण

**अर्जाचा प्राप्त दिनांक :-**28.05.2025

**झाडाची प्रजाती :-** आंबा-1, झाडाची गोलाई -64 इंच, झाडाची वय -61 वर्ष (हेरीटेज)

**झाडाचे विवरण :-** प्लॉट नं. 80, खामला रोड, नागपूर येथील सुरक्षाभिंतीलगत असलेल्या **पुरातन (हेरीटेज)** एक आंबा झाडाच्या अर्जदाराच्या इमारतीवर व शेजारी इमारतीवर झुकलेल्या फांद्यांची छाटणी करण्याची मंजुरी प्रदान करण्याच्या विषयावर सभेत साधक बाधक चर्चा करण्यात आली. चर्चा होऊन वरील अर्जदाराच्या इमारतीवर व शेजारी इमारतीवर झुकलेल्या फांद्यांची छाटणी करण्याची समितीने एकमताने अनुमती प्रदान केली.

**विषय क्र. 43**

**अर्जदाराचे नाव :-** श्री. रुपेश हस्ती

**अर्जाचा प्राप्त दिनांक :-**29.05.2025

**झाडाची प्रजाती :-** रेन ट्री-2, झाडाची गोलाई -61 व 67, इंच, झाडाची वय -58, 65 वर्ष (हेरीटेज)

**झाडाचे विवरण :-** पडोळे चौक, स्वावलंबी नगर, नागपूर येथील सुरक्षाभिंतीलगत असलेल्या **पुरातन (हेरीटेज)** दोन रेन ट्री-2 झाडाच्या रोडवर व विद्युत तारेवर झुकलेल्या फांद्यांची छाटणी करण्याची अनुमती प्रदान करण्याच्या विषयावर सभेत साधक बाधक चर्चा करण्यात आली. चर्चा होऊन वरील वृक्षाच्या रोडवर व विद्युत तारेवर झुकलेल्या फांद्यांची छाटणी करण्याची समितीने एकमताने अनुमती प्रदान केली.

**दिलेले निर्देश:-**

- महाराष्ट्र शासनाने वृक्षाचे वय निश्चित करण्याकरीता फक्त सागवन व साल वृक्षांच्या वाढीचे त्यामुळे इतर वृक्षांचे नेमके वय काढता येत नसल्यामुळे forest व इतर संस्थान पत्र पाठवून नागपूर शहरात आढळणाऱ्या सर्व प्रकारचे झाडांचे वय निश्चित करणे.
- अर्जदाराकडून पर्यायी वृक्ष लागवड केल्याचे प्रतिज्ञापत्र घेणे.
- पर्यायी वृक्ष लागवडीचे स्थळ निरीक्षण करून अहवाल सादर करणे.
- कमीतकमी व्यासाचे झाड प्रत्यारोपण करण्याचे धोरण निश्चित करणे.

➢ पर्यायी वृक्ष लागवडी करीता Open Space चे Land Bank तयार करणे याकरिता नगररचना विभाग, स्थावर विभाग, नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर ने हस्तांतरीत केलेल्या जागेची यादी घेऊन पुढील कार्यवाही करणे.

उपायुक्त (उद्यान)
तथा
वृक्ष अधिकारी
नागपूर महानगरपालिका, नागपूर

प्रशासक
तथा
अध्यक्ष
वृक्ष प्राधिकरण समिती
नागपूर महानगरपालिका, नागपूर